**स्थायी निदेश क्र.२०**

**नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबतची कार्यपध्दत एकत्रित आदेश.**

**(या स्थायी आदेशामध्ये खालील आदेश समाविष्ट करण्यात आलेले आहेत.**

**१. स्थायी निदेश क्र.२०/१ क्र. नप्रसंई - १००३/प्र. क्र.१५०/०३/७ दिनांक :२१ जुन २००४**

**२. स्थायी निदेश क्र.२०/१ क्र. नप्रसंई - १००३/प्र. क्र.१५०/०३/७ दिनांक :१९ ऑक्टोंबर २००४)**

---

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**क्र. नप्रसंई - १००३/प्र. क्र. १५०/०३/७**
**दिनांक : ३१ डिसेंबर, २००३**

**आ दे श**

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, नगरपरिषदांमध्ये प्रचलित अधिनियम/नियम तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णयांचे पालन न करता पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यांत येते. अशी पदोन्नती देतांना कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता, कनिष्ठ पदावरील किमान सेवाकाळ, गोपनीय अहवाल, ५० बिंदूनामावलीनुसार आरक्षण इ.बाबी विचारात घेतल्या जात नाही परिणामी अपात्र कर्मचाऱ्यास पदोन्नती दिल्याने नगरपरिषदेच्या कामकाजावर विपरीत परिणाम होतो. अशा पध्दतीमुळे पदोन्नतीस पात्र असलेल्या कर्मचा-यांवर पदोन्नतीची संधी डावलली गेल्यामुळे त्यांच्या कामकाज क्षमतेवर परिणाम होतो. तसेच काही प्रकरणी असे कर्मचारी न्यायालयात धाव घेतात. व अशा प्रकरणांमध्ये नगरपालिका तसेच शासनाला आपला वेळ नाहक खर्च करावा लागतो. बहुतांश नगरपरिषदेमध्ये एखादा कर्मचाऱ्याने पदोन्नती मिळावी म्हणून अर्ज सादर केल्यानंतर त्याचा अर्ज सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करुन त्यास पदोन्नती देण्यांत येते ही पध्दत तात्काळ बंद करण्यांत यावी. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ मधील संचालकांना असलेल्या अधिकारास अधिन राहून नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या पदान्नतीसाठी खालील पध्दती निश्चित करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा नियम हे या संचालनालयाच्या दिनांक १४.५.८४ च्या आदेशान्वये सर्व नगरपरिषदांना लागू केलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवाजेष्ठता विनियम) नियम, १९८२ नुसार नगरपरिषदांनी कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता यादी प्रतिवर्षी अद्यावत करावयाची आहे.

३. जे पद पदोन्नतीने भरावयाचे आहे ते पद प्रचलित नियमानुसार भरण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता असणे आवश्यक आहे. तसेच सदरचे पद आस्थापनेवर मंजूर असून ते रिक्त असल्यास व्यपगत झालेले नसावे.

४. नगरपरिषद कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना या कार्यप्रणालीमध्ये पारदर्शकता असावी यासाठी खालीलप्रमाणे पदोन्नती समिती गठित करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| अ. | जिल्हा प्रकल्प अधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत नामनिर्देशित केलेला अधिकारी | समिती अध्यक्ष |
| ब. | नगरपरिषदेतील लेखाअधिकारी | सदस्य |
| क. | मुख्याधिकारी | सदस्य सचिव |

वरील तीन अधिकाऱ्यांपैकी एक अधिकारी मागासवर्गीय संवर्गातील असावा, नसल्यास एक अधिक मागासवर्गीय सदस्य (श्रेणी २) जिल्हाधिकाऱ्यांमार्फत नामनिर्देशित करण्यांत यावा.

ज्या नगरपरिषदेच्या आस्थापनेवर लेखापाल/लेखाधिकारी हे पद नसेल तेथे जिल्हाधिकारी कार्यालयातील आस्थापना शाखेतील / लेखा शाखेतील जिल्हाधिकारी नियुक्त करतील ते अधिकारी समितीमध्ये सदस्य म्हणून काम पाहतील. (दि.२१.६.२००४ च्या शुध्दीपत्रकानुसार समाविष्ट)

५. पदोन्नतीपूर्वी बिंदू नामावली आयुक्त कार्यालयातील मागासवर्गीय कक्षाकडून तपासून घेण्यांत यावी, तसेच मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांचे जातीचे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक राहील.

६. या संचालनालयाचे आदेश क्र.संकीर्ण २००१/प्र.क्र.२/कार्यासन ८ दिनांक ९ जानेवारी, २००१ अन्वये विहित करण्यांत आलेली गोपनीय अहवालाची कार्यपध्दत अवलंबून पदोन्नतीपूर्वी गोपनीय अहवालाची प्रतवारी निश्चित करावयाची आहे.

७. सेवाजेष्ठतेप्रमाणे बिनराखीव पदाकरीता व राखीव पदांकरीता प्रत्येक प्रवर्गाकरिता विचारार्थ क्षेत्र पुढीलप्रमाणे राहील.

१) बिनराखीव (सर्वसाधारण प्रवर्ग) पदांकरीता विचारार्थ क्षेत्र.

अ) एक ते तीन नावांची निवडसूची करावयाची असल्यास कमीत कमी सहा कर्मचाऱ्यांचा/अधिकाऱ्यांचा विचार करण्यांत यावा.

ब) चार ते सहा नावांची निवडसूची करावयाची असल्यास निवडसूचीच्या आकाराच्या दुप्पट संख्येइतक्या कर्मचाऱ्यांचा/अधिकाऱ्यांचा विचार करण्यांत यावा.

क) दहापेक्षा जास्त नावांची निवडसूची करावयाची असेल तर निवडसूचीच्या आकाराच्या दीडपट संख्येइतक्या किंवा वीस यापैकी जास्त असेल त्या संख्ये इतक्या कर्मचाऱ्याचा/अधिकाऱ्याचा विचार करण्यांत यावा.

२) राखीव (अनुसुचित जाती/जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती विशेष मागास प्रवर्ग) पदांकरीता विचारार्थ क्षेत्र.

वर्ग-३ चे वर्ग १ मधील पहिल्या पदापर्यतच्या पदांवर पदोन्नती देतांना ५० बिंदू रोष्टरनुसार प्रत्येक मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी/अधिकाऱ्यांसाठी जितकी राखीव पदे असतील त्या राखीव पदांच्या संख्येस अनुसरुन वरील भाग (१) मधील (अ), (ब) आणि (क) मध्ये नमूद केलेल्या संख्येइतक्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचा/अधिकाऱ्यांचा देखिल विचार करण्यांत यावा.

टिप: मागासवर्गीयांकरीता राखीव असलेले पद अथवा पदे आरक्षणमुक्त करण्याचे शासनाचे आदेश झाल्यास त्या प्रमाणात वरील भाग (१) मधील विचारार्थ क्षेत्र वाढून भाग (२) मधील विचारार्थ क्षेत्र कमी होईल.

८. पदोन्नतीसाठी निवड करण्यांत आलेल्या कर्मचाऱ्यांनी खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

अ) पदोन्नती द्यावयाच्या पदासाठी विहित करण्यात आलेली शैक्षणिक पात्रता धारण करणे आवश्यक. शासनाने विहित केलेली संगणकाची MSCIT परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील तसेच शासनाकडून किंवा या संचालनालयाकडून भविष्यात काही परिक्षा विहित केल्या गेल्या तर त्या पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांना बंधनकारक राहतील.

ब) सदर कर्मचा-यांच्या विरुध्द विभागीय चौकशी तसेच फौजदारी गुन्हे प्रलंबित नसावेत.

क) लेखापरिक्षण अहवालामध्ये आक्षेप घेण्यांत आला असल्यास वसुलीची रक्कम भरणा केलेली असावी.

ड) नगरपरिषदेच्या कामकाजाच्या संदर्भात अग्रिम (१ वर्षापेक्षा जास्त जुने) समायोजन बाकी असता कामा नये.

इ) निम्न पदावर किमान ३ वर्ष सलगसेवा झालेली असावी.

९. वरील सर्व बाबींचा विचार करुन समितीने पदोन्नतीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेसाठी ठेवावा.

१०. पदोन्नती समितीने पदोन्नतीसाठी निवड केलेल्या कर्मचाऱ्यांस सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर सुरवातीस एक वर्षाच्या मुदतीपुरती पदोन्नती देण्यांत यावी व त्या काळात पदोन्नतीवरील पदावर सदर कर्मचाऱ्यांचे कामकाज समाधानकारक असल्याचे आढळून आल्यानंतर ही पदोन्नती कायम करण्यांत यावी.

११. या स्थायी निदेशाचे पालन करण्याची जबाबदारी सर्व पदाधिकारी/अधिकारी व कर्मचारी यांची राहील. या स्थायी निदेशाचे नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत वाचन करुन त्याची नोंद कार्यवृत्तांतात घ्यावी.

१२. नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांना पदोन्नती कोणत्याप्रकारे देण्यात यावी याची कार्यपध्दती विशद करण्यात आलेली आहे. असे असतांनाही या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, नगरपरिषदा त्यांच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना त्यांच्यावर अन्याय केला जातो अशा तक्रारी नगरपरिषद कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या आहेत.

१३. पदोन्नती संदर्भात अन्याय झाला असल्याबद्दल ज्या नगरपरिषद कर्मचा-यांची तक्रार असेल त्यांनी दाद कोणाकडे मागावी यासंदर्भात मार्गदर्शन करण्याची गरज विचारात घेऊन खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

१४. नगरपरिषदेच्या कर्मचा-यांच्या पदोन्नती संदर्भातील तक्रारी संदर्भात संबंधित कर्मचा-यांनी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३१८ अन्वये आयुक्त व प्रादेशिक संचालक यांचेकडे दाद मागावी. (परि. १२ ते १४ दि.१९.१०.२००४ च्या निर्देशा नुसार समाविष्ट )

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय